
# शिवछत्रपती – अभ्यास वर्ग

## प्रश्नमंजुषा



सौजन्य: "शिवछत्रपती" पुस्तकाचे मुखपृष्ठ, इयत्ता चौथी, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

नमस्कार बालमित्रांनो,

**छत्रपती शिवाजी महाराज** हे सर्व मराठी माणसांचे दैवत आहेत. त्यांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना करून केवळ महाराष्ट्र  राज्यच  नव्हे, तर संपूर्ण भारत  देशाच्या इतिहासाचीच दिशा बदलली.

शिवाजी महाराजांविषयी तुम्हाला अधिक जाणून घेता यावे, तसेच आपले पूर्वज कोण होते आणि त्यांनी कोणते पराक्रम केले हे समजावे, या उद्देशाने आम्ही तुमच्यासाठी एक नवा आणि रंजक उपक्रम घेऊन आलो आहोत: **"शिवछत्रपती अभ्यास वर्ग"!**

या उपक्रमामध्ये शिवाजी महाराजांच्या जीवनातील महत्त्वाच्या घटनांवर आधारित प्रश्नमंजुषा तयार करण्यात आली आहे. त्याचबरोबर बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या संकेतस्थळावर तुमच्यासाठी सोडवता येईल अशी सोपी बहुपर्यायी  प्रश्नावली  देखील उपलब्ध करून देण्यात आली आहे.

आपण आपल्या पालकांसोबत शिवाजी महाराजांविषयी अभ्यास करा, त्यांच्याकडून विविध घटनांची माहिती जाणून घ्या आणि बृहन्महाराष्ट्र मंडळाची **"शिवछत्रपती अभ्यास वर्ग"** परीक्षा उत्तीर्ण होऊन **प्रमाणपत्र** मिळवा. या विषयी अधिक माहिती मिळवण्यासाठी शाळेच्या संकेतस्थळाला भेट द्या.

हा अभ्यासक्रम शिकताना तुम्हाला छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल आणि त्यांना साथ देणाऱ्या सर्व मावळ्यांबद्दल नक्कीच अभिमान वाटेल आणि नकळतच तुमच्या तोंडून उद्गार बाहेर पडतील —
**"शिवाजी महाराज की जय!"**

ही प्रश्नमंजुषा तयार करण्यासाठी सौ. यशस्विनी गोरे-लिमये तसेच श्री. मिलिंद कुलकर्णी यांचे मोलाचे सहकार्य लाभले. तसेच बृहन्महाराष्ट्र मंडळाचे शाळा संचालक श्री. राहुल देशमुख यांनी या प्रकल्पासाठी दिलेले मार्गदर्शन व सहकार्य अतिशय महत्त्वाचे ठरले. या सर्वांचे मी मनापासून आभार मानतो.

सर्व विद्यार्थ्यांना **"शिवछत्रपती अभ्यास  वर्गासाठी"** मनःपूर्वक शुभेच्छा!

आपला,

प्रसाद पानवळकर

प्रसाद पानवळकर
अध्यक्ष, बृहन्महाराष्ट्र मंडळ
https://bmmonline.org/

## अनुक्रमणिका


धडा १, शिवजन्मापूर्वीचा महाराष्ट्र

धडा २, संतांची कामगिरी

धडा ३, मराठे सरदार - भोसल्यांचे कर्तबगार घराणे

धडा ४, शिवरायांचे बालपण

धडा ५, स्वराज्य स्थापनेची प्रतिज्ञा

धडा ६, स्वराज्याचे तोरण बांधले

धडा ७, स्वकीय शत्रूंचा बंदोबस्त

धडा ८, प्रतापगडावरील पराक्रम

धडा ९, शर्थीने खिंड लढवली

धडा १०, शाहिस्तेखानाची फजिती

धडा ११, पुरंदरचा वेढा व तह

धडा १२, बादशहाच्या हातावर तुरी दिल्या

धडा १३, गड आला पण सिंह गेला

धडा १४, एक अपूर्व सोहळा

धडा १५, राज्यकारभाराची घडी बसवली

धडा १६, दक्षिणेतील मोहीम

धडा १७, शिवरायांची युद्धनीती

धडा १८, रयतेचा राजा

धडा १९, स्फूर्तीचा जिवंत झरा


शिवरायांचे आठवावे रूप ।
शिवरायांचा आठवावा प्रताप ।
शिवरायांचा आठवावा साक्षेप ।
भूमंडळी ।।१।।

शिवरायांचे कैसें बोलणें ।
शिवरायांचे कैसें चालणें ।
शिवरायांची सलगी देणे ।
कैसी असे ।।२।।

सकल सुखांचा केला त्याग ।
म्हणोनि साधिजें तो योग ।
राज्यसाधनाची लगबग ।
कैसीं केली ।।३।।

याहुनी करावें विशेष ।
तरीच म्हणवावें पुरुष ।
या उपरीं आता विशेष ।
काय लिहावे ।।४।।

शिवरायांसी आठवावें ।
जीवित तृणवत् मानावें ।
इहलोकी परलोकीं उरावे ।
कीर्तीरूपें ।।५।।

निश्चयाचा महामेरू ।
बहुत जनांसी आधारू ।
अखंड स्थितीचा निर्धारु ।
श्रीमंत योगी ।।६।।

**- समर्थ रामदासस्वामी**

## धडा १,   शिवजन्मापूर्वीचा महाराष्ट्र

शिवाजी महाराजांनी महाराष्ट्रात स्वराज्य निर्माण केले. स्वराज्य म्हणजे काय?

स्वतःची जमीन, स्वतःचा विश्वास, **स्वतःचे राज्य**

शिवाजी महाराजांपूर्वी सुमारे किती वर्षे महाराष्ट्रात स्वराज्य नव्हते?

१५०, **३५०,** ५३०

शिवाजी महाराजांपूर्वी महाराष्ट्राच्या प्रजेवर कोण जुलूम करीत होते?

**निजामशाहा आणि आदिलशाहा,** नवाजशाहा आणि आजमशाहा, रफीकशाहा आणि दिलावरशाहा

निजामशाहा आणि आदिलशाहा यांच्यात लढाया होत असल्यामुळे रयतेला कसे वाटत असे?

**असुरक्षित,** आनंदी, उत्साही

शिवाजी महाराजांनी रयतेला सुखी करण्यासाठी कुठले कार्य हाती घेतले?

**हिंदवी स्वराज्य स्थापना,** वृक्ष लावणे, आरमार

शिवाजी महाराजांनी रयतेला सुखी करण्यासाठी कोणाला आपल्या काबूत आणले?

माळ्यांना, **वतनदारांना,** घोडेवाल्यांना

स्वराज्य कुठल्या प्रकारच्या लोकांचे होते?

फक्त एकाच धर्माच्या, फक्त एकाच जातीच्या, **सर्व जातिधर्माच्या लोकांचे**

कोणाच्या कामगिरीचा स्वराज्य स्थापनेच्या कामी उपयोग झाला?

**संतांच्या,** भांडणाऱ्यांच्या, बेकाबू सरदारांच्या

आपण शिवजयंतीला कुठली विशेष शौर्यगीते म्हणतो?

निबंध, **पोवाडे,** ओव्या

आपण महाराजांच्या नावाचा जयजयकार कुठली घोषणा देऊन करतो?

हल्ला बोल, उठा उठा, **शिवाजी महाराज की जय!**

अहमदनगरच्या राजाचे नाव काय होते?

कुतुबशहा, आदिलशहा, **निजामशहा**

विजापूरच्या राजाचे नाव काय होते?

निजामशहा, **आदिलशहा**, कुतुबशहा

निजामशहा कुठे राहत होता?

पुणे, **अहमदनगर**, विजापूर

आदिलशहा कुठे राहत होता?

सातारा, अहमदनगर, **विजापूर**

## धडा २,    संतांची कामगिरी

नामदेव, ज्ञानेश्वर, एकनाथ यांसारखे थोर संत कुठल्या राज्यात होऊन गेले?

बिहार, केरळ, **महाराष्ट्र**

संतांनी  लोकांना कुठली शिकवण दिली?

गायन, शेती, **समता**

संत नामदेव कुठल्या समाजातले होते?

**शिंपी,** लोहार, सोनार

संत नामदेवांनी पंजाबात जाऊन कुठल्या भाषेत पदे लिहिली?

अवधी, पंजाबी, **हिन्दी**

संस्कार करणाऱ्या धार्मिक कथा आणि गीताच्या कार्यक्रमाला काय म्हणतात ?

आरती, महाकाव्य, **कीर्तन**

निवृत्तीनाथ, सोपानदेव आणि मुक्ताई ह्यांच्या भावाचे नाव काय होते?

**संत ज्ञानेश्वर,** संत कबीर, संत विश्वेश्वर

संत ज्ञानेश्वरांनी, संस्कृत गीतेचा अर्थ समजावून सांगणारा ग्रंथ लिहिला, तो कोणता?

बोधयुग, आकाशवाणी, **ज्ञानेश्वरी**

संत तुकाराम हे कुठल्या गावचे राहणारे होते?

दादर, **देहू,** लखनऊ

शिखांच्या धर्मग्रंथात कोणाची पदे आहेत?

संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर, **संत नामदेव**

महाराष्ट्रातील कोणत्या संताने पंजाब मध्ये जाऊन हिंदीमध्ये पदे लिहिली?

संत रामदास, **संत नामदेव,** संत एकनाथ,

ज्ञानेश्वर महाराज कोणत्या गावचे होते?

देहू, आळंदी, **आपेगाव**

ज्ञानेश्वर महाराजांनी समाधी कोठे घेतली?

देहू, **आळंदी**, पुणे

ज्ञानेश्वर महाराजांच्या बहिणीचे नाव काय होते?

**मुक्ताई**, जनाई, रमाई

संत एकनाथ हे कोणत्या गावचे राहणारे होते?

**पैठण**, देहू, आळंदी

भारुडे कोणी लिहिली?

**संत एकनाथ,** संत तुकाराम, संत रामदास

संत तुकाराम महाराजांचे काय प्रसिद्ध आहेत?

कविता, पुस्तके, **अभंग**

मनाचे श्लोक कोणी लिहिले?

संत तुकाराम, **संत रामदास,** संत ज्ञानेश्वर

संत रामदासांचे मूळ नाव काय?

**नारायण**, गोविंद, गजानन

संत रामदासांचा जन्म कोणत्या दिवशी झाला?

हनुमान जयंती, गणेश चतुर्थी,  **राम नवमी**

संत रामदासांनी कोणता ग्रंथ लिहिला?

ज्ञानेश्वरी, **दासबोध**,गाथा

संत रामदासांनी ठिकठिकाणी कोणती मंदिरे उभारली?

गणपतीची देवीची, **हनुमानाची**

“जय जय रघुवीर समर्थ” ही गर्जना कोणाची होती?

संत एकनाथ, संत नामदेव, **संत रामदास**

"प्राण्यांवरही दया करा" हा उपदेश कोणी केला?

संत रामदास, **संत एकनाथ,** संत तुकाराम

"ज्ञानेश्वरी" कोणत्या भाषेत आहे?

संस्कृत, **मराठी**, हिंदी

ज्ञानेश्वरांच्या काळात धर्माचे ज्ञान कोणत्या भाषेत असायचे?

**संस्कृत**, मराठी, हिंदी

"ताटी उघडा ज्ञानेश्वरा" असे कोण म्हणाली?

जनाई, **मुक्ताई,** रमाई

पैठण हे गाव कोणत्या नदीकाठी वसले आहे?

कृष्णा, **गोदावरी**, इंद्रायणी

ज्ञानेश्वर यांच्या घरातील कोणी संन्यास घेतला होता?

**वडिलांनी**, आईने, भावाने

ज्ञानेश्वरांच्या भावांची नावे काय?

गोपाळदास आणि जगन्नाथ, **निवृत्तीनाथ आणि सोपानदेव**, विष्णुपंत आणि दामोदरदास

संत रामदास यांचा जन्म कोणत्या गावी झाला?

चिपळूण, पैठण, **जांब**

--

## धडा ३, मराठे सरदार - भोसल्यांचे कर्तबगार घराणे

शिवाजी महाराजांच्या जन्माच्या वेळी महाराष्ट्रात कोणामध्ये लढाया होत?

कुतुब शाह आणि अकबर शाह,बरकत शाह आणि कुतुब शाह, **आदिल शाह आणि निजाम शाह**

जिजाईच्या वडिलांचे नाव काय होते?

**लखुजी जाधव,** खडुजी निंबाळकर, विश्वासराव सरलष्कर,

महराष्ट्रातील कुठले घराणे मोठे पराक्रमी निघाले?

पैठणचे पाटील घराणे, **वेरूळचे भोसले घराणे,** सातारचे घोरपडे घराणे

वेरूळच्या लेण्यांजवळील कुठले मंदिर मोडकळीस आले होते?

**घृष्णेश्वराचे मंदिर,** शंकराचे मंदिर, गणपतीचे मंदिर

घृष्णेश्वराचा जीर्णोद्‌धार कोणी केला?

पंतोजी जेधे, टिपरोजी नाईक, **मालोजी भोसले**

मालोजीरावांची पत्नी कोण होती?

लक्ष्मीबाई, **उमाबाई,** सीताबाई

शहाजी किती वर्षांचा असताना मालोजीराव इंदापूरच्या लढाईत मारले गेले?

९,१५, **५**

शहाजीराजांना कुठल्या दरबारात मोठा मान होता?

**निजामशाही दरबारात,** दौलतशाही दरबारात, अकबरशाही दरबारात

निजामशाही वाचवण्यासाठी शहाजी राजांबरोबर कोण लढले?

माणिक हौसर, **मलिक अंबर,** सरदार मलिक

आदिल शहाला जाऊन मिळाल्यावर, त्याने शहाजी राजांना कुठला किताब दिला?

सरफरोश, **सरलष्कर,** सरंजाम

मालोजी भोसले यांच्या धाकट्या भावाचे नाव काय?

**विठोजी**, रघुजी, बाळाजी

शहाजीराजे यांच्या वडिलांचे नाव काय?

विठोजी, **मालोजी**, कान्होजी

शहाजी राजे यांच्या आईचे नाव काय?

**उमाबाई**, राधाबाई, ताराबाई

शहाजीराजे यांच्या भावाचे नाव काय

शिवाजी, संभाजी, **शरीफजी**

निजामशहाची आधीची राजधानी कोणती होती?

**दौलताबाद**, औरंगाबाद, खुलदाबाद

निजामशहाच्या वजीराचे नाव काय होते?

दिलेरखान, जसवंत सिंग, **मलिक अंबर**

निजामशाहीतून आदिलशाहीत आणि नंतर परत निजामशाही मध्ये कोण आले?

**शहाजी राजे**, शिवाजी राजे, संभाजी राजे

निजामशहाने मालोजीरावांना कोणती जहागिरी दिली?

सातारा व कोल्हापूर, **पुणे व सुपे,** अहमदनगर व औरंगाबाद

कोणत्या मुघल बादशहाने निजामशाहीवर स्वारी केली?

औरंगजेब, अकबर, **शाहजहान**

--

## धडा ४, शिवरायांचे बालपण

शिवनेरी हा किल्ला कोणत्या जिल्ह्यात आहे?

मुंबई, **पुणे**, औरंगाबाद

शिवाजी महाराजांचा जन्म कोणत्या किल्यावर झाला?

पुरंदर, तोरणा, **शिवनेरी**

शिवनेरी किल्ल्यावर कोणाचा जन्म झाला?

संभाजी महाराज, राजाराम महाराज, **शिवाजी महाराज**

शिवबाच्या वडिलांचे चे नाव काय?

**शहाजी**, विजयराज, एकनाथ

शिवबाच्या आईचे नाव काय?

जनाबाई, **जिजाबाई**, विठाबाई

पुण्याचे जुने  नाव काय होते?

जुन्नर, **पुनवडी**, बंगळूर

पुणे कोणत्या नदी च्या काठावर वसले आहे?

इंद्रायणी  कृष्णा, **मुठा**

शिवाजी महाराजांचे गुरू कोण होते?

**दादोजी कोंडदेव**, शहाजी राजे, एकनाथ

दादोजी कोंडदेव यांनी पुण्यात जो वाडा बांधला त्याचे  नाव काय?

ताजमहाल, **लाल महाल**, विश्रामबाग  वाडा

पुण्यातील शेतकऱ्यांना कोणता प्राणी त्रास देत असे?

हत्ती, **लांडगा**, वाघ

विजापूर मध्ये कोणाचे राज्य होते?

शाहजहान, **अदिलशाहा**, शिवाजी

शिवाजी महाराजांचे नाव कोणत्या देवीच्या नावावरून ठेवले आहे?

**शिवाई**, गौराई, लहानाई

शिवाजी महाराज लहान असताना शहाजीराजे त्यांना आणि जिजाबाईंना कोठे घेऊन गेले?

**बंगळूर**, मुंबई, मद्रास

शिवरायांचे लग्न कितव्या वर्षी झाले?

**१४,** १२, १७

शिवरायांच्या पहिल्या पत्नी चे नाव काय?

राधाबाई, **सईबाई**, आनंदीबाई

शिवाजी महाराजांचे सईबाई बरोबर लग्न कुठे झाले?

पर्वती, शनिवार वाडा, **लाल महाल**

मावळात राहणाऱ्या लोकांना काय म्हणतात?

मुघल, **मावळे**, रजपूत

दादोजी कोंडदेव यांनी कोणत्या शहराचा विकास केला?

कोल्हापूर, सातारा, **पुणे**

--

## धडा ५, स्वराज्य स्थापनेची प्रतिज्ञा

पुण्याच्या नैऋत्येला कोणते रमणीय स्थान होते?

विजापूर, **रायरेश्वर शिवालय**, शिवनेरी

दादोजीपंत कोणत्या किल्ल्याचे सुभेदार होते?

शिवनेरी, रायरेश्वर, **कोंढाणा**

शिवरायांनी स्वराज्याची शपथ कोठे घेतली?

लालमहाल, कोंढाणा**, रायरेश्वर**

शिवरायांनी कोणते थोर कार्य हाती घेतले?

**स्वराज्य स्थापना**, घोडदौड करणे, आडमार्ग शोधणे

मावळातील वतने कोण सांभाळत होते?

**देशमुख**, अदिलशाहा, दादोजी

शिवरायांची राजमुद्रा कोणत्या भाषेत लिहली आहे?

फार्सी, मराठी, **संस्कृत**

स्वराज्याची शपथ घेतल्यावर शिवरायांनी लगेच कोणाची भेट घेतली?

शहाजीराजे, दादोजी, **जिजाबाई**

मावळातील देशमुख मंडळी कशासाठी आपापसांत भांडत असत?

**वतनासाठी**, स्वराज्यासाठी, घोड्यांसाठी

स्वराज्य स्थापनेसाठी शिवरायांना कोणाचे आशीर्वाद मिळाले?

आदिलशाहा, देशमुख, **जिजामाता**

शिवरायांनी त्यांच्या सवगड्यांना कोणते ध्येय समजावून सांगितले?

किल्ले जिंकणे, तलवार चालवणे, **हिंदवी स्वराज्य**

--

## धडा ६, स्वराज्याचे तोरण बांधले

जंजिऱ्यावर कोणाची सत्ता होती?

मुघल बादशाह, **सिद्दी**, पोर्तुगीज

तोरणा किल्ल्यावर वरील २ माच्यांची नावे काय?

**झुंझार माची व बुधला माची**, सुपे माची व चाकण माची, दक्षिण माची व कल्याण माची

तोरणा किल्ल्याचे नाव कशावरून पडले?

शिवाई देवी, **तोरणजाई देवी**, मुंबा देवी

तोरणा किल्ला कोणत्या खोऱ्यात आहे?

पुणे, इंदापूर, **कानद**

तोरणा किल्ल्यावर मराठ्यांचे निशाण कोणी लावले?

**तानाजी**, येसाजी, दादोजी

तोरणा किल्ला जिंकल्यावर शिवरायांनी त्यांच्या काय नाव दिले?

शिवनेरी, **प्रचंडगड**, कोंढाणा

तोरणा किल्ल्याची दुरुस्ती सुरू असताना काय आश्चर्य घडले?

**रूपयांनी भरलेल्या घागरी सापडल्या**, शूर माणसे मिळाली, शिंगाचा आवाज घुमला

शिवरायांना कोणती देवी प्रसन्न आहे असे सर्वजण म्हणू लागले?

अंबाबाई, **भवानी**, शिवाई

तोरण्यासून पंधरा किलोमीटरवर पूर्वेला कोणता डोंगर आहे?

कोंढाणा, **मुरूंबदेव**, शिवनेरी

मुरूंबदेवाच्या  डोंगराची डागडुजी करून शिवरायांनी त्याचे नाव काय ठेवले?

पुरंदर, **राजगड**, तोरणा

स्वराज्याची पहिली राजधानी कोणती?

तोरणा, कोंढाणा, **राजगड**

शिवरायांच्या बंडखोरीची हकीकत आदिलशाहाच्या कानावर कोणी घातली?

मावळच्या मावळ्यांनी, **शिरवळच्या ठाणेदाराने**, पुण्याच्या देशमुखांनी

शिवाजी महाराजांनी तोरणा गड घेण्याआधी महाराष्ट्रात किती सत्ता राज्य करीत होत्या?

६, **४**, ८

--

## धडा ७,    स्वकीय शत्रूंचा बंदोबस्त

शिवरायांच्या मेहुण्याचे नाव काय?

तानाजी मालुसरे, **बजाजी नाईक निंबाळकर**, दादोजी कोंडदेव

जावळीचे जहागीरदार कोण होते?

संभाजी मोहिते, **चंद्रराव मोरे**, येसाजी कंक

जावळीच्या मोऱ्यांना आदिलशहाने कोणता किताब दिला होता?

**चंद्रराव**, दादोजी, तानाजी

दौलतराव  मोरे मरण पावल्यानंतर जावळीच्या गादीवर कोण बसला?

शिवाजी  मोरे, **यशवंतराव  मोरे**,  दादोजी  कोंडदेव

जावळी मध्ये कोणता किल्ला होता?

**रायरी**, कोंढाणा, राजगड

रायरी किल्ला शिवरायांनी कोणाकडून जिंकून घेतला?

दौलतराव  मोरे, **यशवंतराव  मोरे**, तानाजी  मालुसरे

जावळीच्या लढाईत यशवंतरावाने शिवरायांच्या विरुद्ध किती काळ झुंज दिली?

३ दिवस, ३ महिने, **१ महिना**

रायरी  किल्ल्यावरून  यशवंतरावाने शिवरायांच्या विरुद्ध किती काळ झुंज दिली?

३ दिवस, **३ महिने,** १ महिना

रायरीच्या किल्ल्याचे नाव शिवरायांनी काय ठेवले?

**रायगड**, प्रतापगड, शिवनेरी

रायरी किल्ल्याच्या जवळ कोणता डोंगर आहे?

मुरूंबदेव, **भोरप्या**, शिवनेरी

भोरप्या डोंगरावर शिवरायांनी कोणता किल्ला बांधला?

राजगड, **प्रतापगड**, पुरंदर

--

## धडा ८, प्रतापगडावरील पराक्रम

शिवाजी महाराजांना पकडून आणण्यासाठी विजापूर दरबारातून कोणी मागणी केली?

नूरजहा, **बडी साहेबा**, मुमताज

अफजल खान हा कोणत्या प्रांताचा सुभेदार होता?

**वाई,** सातारा, विजापूर

अफजल खान विजापूरहून निघाला तेव्हा शिवाजी महाराज कोणत्या किल्ल्यावर होते?

रायगड, प्रतापगड, **राजगड**

फजलखानाने कोणत्या देवस्थानांना उपद्रव दिला?

कोल्हापूर-माहूर, **तुळजापूर-पंढरपूर**, शिर्डी-शेगाव

शिवाजी महाराजांनी अफजल खानाच्या भेटीसाठी काय उभारले?

**शामियाना**, महाल, घर

अफजलखानाच्या भेटीच्या वेळी शिवाजी महाराजांच्या अंगरक्षकाचे नाव काय?

नेताजी पालकर, बाजीप्रभू देशपांडे, **जीवा महाला**

अफजलखानाच्या अंगरक्षकाचे नाव काय होते?

महंमद घोरी, **सय्यद बंडा**, मिर्झा जयसिंग

शिवाजी महाराजांनी अफजल खान भेटीच्या वेळी अंगरख्याखाली काय घातले होते?

**चिलखत**, सदरा, बंडी

अफजलखानाने शिवाजी महाराजांवर कशाने वार केला?

तलवार, **कट्यार**, भाला

शिवाजी महाराजांनी अफजल खानाच्या पोटात काय घुसवले?

तलवार, भाला, **बिचवा**

जिवा महालाने कोणाला मारले?

**सय्यद बंडा**, तैमूर लंग, हुसेन अली

होता जीवा म्हणून वाचला _______

रामा, **शिवा**, कृष्णा

अफजलखानाच्या मुलाचे नाव काय?

सय्यद बंडा, नूर अहमद, **फाजल खान**

अफजलखानाच्या वकिलाचे नाव काय?

**कृष्णाजी भास्कर**, रामोजी पंत, गणोजी दत्त

अफजलखानाच्या भेटीच्या आधी शिवाजी महाराजांनी कोणाचे दर्शन घेतले?

जिजामाता, **भवानी माता,** अंबाबाई

--

## धडा ९, शर्थीने खिंड लढवली

अफजल खान वधानंतर विजापूरच्या आदिलशहाने शिवाजी महाराजांशी लढायला कोणाला पाठवले?

अकबर, **सिद्धी जौहर,** अली खान

सिद्धी जौहरने कोणत्या किल्ल्याला वेढा दिला?

**पन्हाळगड**, सिंहगड, राजगड

शिवाजी महाराज पन्हाळगडावरून कोणत्या गडावर निसटून जात होते?

राजगड, रायगड, **विशाळगड**

शिवाजी महाराज कोणत्या गडावरून विशाळगडाकडे निसटून जात होते?

रायगड, **पन्हाळगड**, राजगड

बाजीप्रभू कोणत्या खिंडीत लढले?

अमरखिंड, **घोडखिंड**, जयखिंड

घोडखिंड आता कोणत्या नावाने ओळखली जाते?

**पावनखिंड**, पवित्रखिंड, धैर्यखिंड

पन्हाळगडावरून विशाळगडाकडे जाताना घोडखिंडीत कोण लढले?

नेताजी पालकर, तानाजी मालुसरे, **बाजीप्रभू देशपांडे**

सिद्धी जौहरने शिवाजी महाराजांचा पाठलाग करण्यासाठी कोणाला पाठवले?

अली अकबर, **सिद्धी मसऊद**, शाहिस्तेखान

शिवाजी महाराज पन्हाळगडावरून निसटले तेव्हा कोणता ऋतू होता?

**पावसाळा**, हिवाळा, उन्हाळा

शिवाजी महाराज कोणत्या वेळी पन्हाळगडावरून निसटले?

सकाळी, दुपारी, **रात्री**

--

## धडा १०, शाहिस्तेखानाची फजिती

औरंगजेब हा कोणता बादशाह होता?

आदिलशाही, निजामशाही, **मुघल**

शाहिस्तेखान हा औरंगजेबाचा कोण होता?

**मामा**, काका, मोठा भाऊ

शाहिस्तेखानाने कोणत्या शहरावर स्वारी केली?

सातारा, कोल्हापूर, **पुणे**

चाकणच्या किल्ल्यात शाहिस्तेखाना विरुद्ध कोण लढला?

मुरारबाजी, **फिरंगोजी नरसाळा**, बाजीप्रभू देशपांडे

शाहिस्तेखानाने पुण्यात कुठे मुक्काम केला?

**लाल महाल**, शनिवार वाडा, पर्वती

शिवाजी महाराज लाल महाला पर्यंत कसे पोहोचले?

गणपती मिरवणुकी मधून**, लग्नाच्या वराती मधून**, रथयात्रे मधून

शिवाजी महाराजांनी कोणाची बोटे कापली?

अफजलखान, सिद्धी जौहर, **शाहिस्तेखान**

औरंगजेबाने बोटे तुटलेल्या शाहिस्तेखानाची बदली कोठे केली?

**बंगाल,** उत्तर प्रदेश, गुजरात

मराठ्यांच्या कोणत्या युद्ध प्रकाराला शाहिस्तेखानाचे सैन्य कंटाळले?

समुद्र लढा, **गनिमी कावा,** मैदानी लढा

शाहिस्तेखानाने सगळ्यात पहिल्यांदा कोणत्या किल्ल्याला वेढा दिला?

**पुरंदर**, सिंहगड, रायगड

--

## धडा ११, पुरंदरचा वेढा व तह

शिवाजी महाराजांनी कोणती बाजारपेठ लुटली?

**सुरत,** सातारा, कोल्हापूर

सुरतेवर कोणाची सत्ता होती?

आदिलशहा, निजामशहा, **मुघल**

सुरत लुटल्यावर औरंगजेबाने मराठ्यांना हरवण्यासाठी कोणाला पाठवले?

सिद्धी जौहर आणि सिद्धी मसूद, **मिर्झाराजे जयसिंग आणि दिलेरखान**, शाहिस्तेखान आणि अफजलखान

पुरंदर किल्ल्याला कोणी वेढा दिला?

**दिलेरखान**, औरंगजेब, अफजलखान

दिलेरखानाने कोणत्या किल्ल्याला वेढा दिला?

राजगड, सिंहगड, **पुरंदर**

पुरंदर किल्ल्याचा किल्लेदार कोण होता?

**मुरारबाजी**, तानाजी, येसाजी

शिवाजी राजांनी जयसिंगा बरोबर केलेल्या तहाला काय म्हणतात?

सिंहगडचा तह, **पुरंदरचा तह,** रायगडचा तह

पुरंदर च्या तहानुसार शिवाजी महाराजांना किती किल्ले मुघलांना द्यावे लागले?

**२३,** ३३, ४३

पुरंदरच्या तहानंतर शिवाजी महाराजांनी कोठे जाऊन औरंगजेबाला भेटण्याचे ठरवले?

दिल्ली, **आग्रा,** मथुरा

शिवाजी महाराजांच्या आग्रा भेटीतील सुरक्षिततेची हमी कोणी घेतली?

दिलेरखान, अफजल खान, **मिर्झाराजे जयसिंग**

--

## धडा १२, बादशहाच्या हातावर तुरी दिल्या

शिवाजी महाराज कोणाबरोबर आग्र्याला गेले?

शाहू महाराज, **संभाजी महाराज**, राजाराम महाराज

शिवाजी महाराजांच्या आग्रा भेटीच्या वेळी औरंगजेबाचा कितवा वाढदिवस होता?

**५०,** ६०, ७५

औरंगजेबाच्या दरबारात शिवाजी महाराजांच्या पुढील रांगेत कोण उभा होता?

**जसवंत सिंग राठोड**, मिर्झाराजे जयसिंग, दिलेरखान

शिवाजी महाराज आणि संभाजी महाराजांबरोबर आग्र्यामध्ये कोणते प्रमुख सेवक राहिले?

तानाजी मालुसरे आणि बाजीप्रभू देशपांडे, **हिरोजी फर्जंद आणि मदारी मेहतर,** नेताजी पालकर आणि येसाजी कंक

शिवाजी महाराजांनी आग्र्यातून साधू व मौलवींना काय पाठवायला सुरुवात केली?

वस्तू, पैसे, **मिठाई**

आग्र्यातून निसटताना शिवाजी महाराजांच्या जागी कोण झोपला?

**हिरोजी,** मदारी, तानाजी

शिवाजी महाराज आग्र्याहून निसटल्यावर कोणाला पाय चेपायला बसवले?

हिरोजी, **मदारी**, तानाजी

हिरोजी आणि मदारी काय आणायला जातो असे सांगून आग्र्यातून निसटले?

मिठाई, दूध, **औषध**

शिवाजी महाराज आणि संभाजी महाराज कशामध्ये बसून आग्र्यातून निसटले?

**पेटारा**, कावड, पालखी

संभाजी महाराजांना आग्र्याहून निसटल्यावर काही दिवसांसाठी कोठे ठेवले?

दिल्ली, **मथुरा**, काशी

आग्र्याहून निसटल्यावर शिवाजी महाराज कोणत्या किल्ल्यावर सुखरूप पोहोचले?

**राजगड**, रायगड, सिंहगड

आग्र्याहून सुटका झाल्यावर संभाजी महाराज किती महिन्यांनी राजगडावर पोहोचले?

**२**, ४, ६

--

## धडा १३, गड आला पण सिंह गेला

तानाजी मालुसरे यांचे गाव कोणते?

शिर्डी, शेगाव, **उमरठे**

तानाजींच्या मुलाचे नाव काय?

**रायबा**, तुकोबा, राघोबा

तानाजीच्या मामाचे नाव काय?

बाळ मामा, सदा मामा, **शेलार मामा**

तानाजी कुणाच्या लग्नाचे आमंत्रण द्यायला शिवाजी महाराजांकडे गेला?

**मुलाच्या**, भावाच्या, नातवाच्या

“आधी लग्न कोंढाण्याचे, मग रायबाचे” असे कोण म्हणाला?

येसाजी, **तानाजी**, शेलार मामा

कोंढाणा किल्ल्याचा किल्लेदार कोण होता?

मिर्झाराजे, दिलेरखान, **उदेभान**

कोंढाण्याच्या किल्लेदार उदेभान कोण होता?

**रजपूत**, मराठा, मुघल

तानाजीच्या धाकट्या भावाचे नाव काय?

येसाजी, **सूर्याजी**, विठोजी

तानाजी ची ढाल तुटल्यावर त्याने हाताला काय बांधले?

**शेला**, सदरा, दोऱ्या

सूर्याजीने कोंढाणा किल्ल्यावरील कोणत्या दरवाजातून किल्ल्यावर प्रवेश केला?

पश्चिम दरवाजा, दक्षिण दरवाजा, **कल्याण दरवाजा**

कोंढाणा किल्ल्यावरील कल्याण दरवाजा जवळील दोर कोणी कापला?

**सूर्याजी**, तानाजी, येसाजी

शिवाजी महाराजांनी कोंढाणा किल्ल्याचे नवीन नाव काय ठेवले?

राजगड, रायगड, **सिंहगड**

--

## धडा १४, एक अपूर्व सोहळा

शिवाजी महाराजांनी कोणत्या मंदिरात स्वराज्याची प्रतिज्ञा घेतली?

**रायरेश्वर**, कर्णेश्वर, ओंकारेश्वर

शिवाजी महाराजांनी राजधानीसाठी कोणत्या किल्ल्याची निवड केली?

राजगड, **रायगड**, लोहगड

राज्याभिषेक करण्यासाठी काशीवरून कोण आले?

तेनालीराम, **गागाभट्ट**, दामोदर पंत

राज्याभिषेकासाठी गागाभट्ट कोठून आले?

पुणे, कोल्हापूर. **काशी**

शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाला अंदाजे किती माणसे जमली?

१०,०००, ३०,०००, **५०,०००**

शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाच्या वेळी किती नद्यांचे पाणी आणण्यात आले?

**७,** १०, १५

शिवाजी महाराजांच्या अष्टप्रधान मंडळात किती लोक होते?

५, ७, **८**

--

## धडा १५, राज्यकारभाराची घडी बसवली

शिवाजी महाराजांनी राज्यकारभार करण्यासाठी किती खात्यात विभागणी केली

५, ६, **८**

शिवाजी महाराजांनी कोणते नवीन सैन्यदल निर्माण केले?

**आरमार**, घोडदळ, पायदळ

खालीलपैकी कोणता किल्ला समुद्र किल्ला आहे?

रायगड, **सिंधुदुर्ग**, शिवनेरी

खालीलपैकी कोणता किल्ला समुद्र किल्ला आहे?

राजगड, पन्हाळगड, **विजयदुर्ग**

शिवाजी महाराजांकडे राज्याभिषेक झाला तेव्हा अंदाजे किती किल्ले होते?

१००, २००, **३००**

शिवाजी महाराजांच्या गुप्तहेर खात्याचा प्रमुख कोण होता?

**बहिर्जी नाईक,** तानाजी मालुसरे, बाजीप्रभू देशपांडे

--

## धडा १६, दक्षिणेतील मोहीम

शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकानंतर किती दिवसात जिजामाता मृत्यू पावल्या?

**१२,** १५, ३०

शिवाजी महाराजांनी राज्याभिषेकानंतर कोणत्या प्रांतावर स्वारी करायचे ठरविले?

गुजरात, आग्रा, **कर्नाटक**

शिवाजी महाराजांनी गोवळकोंडाच्या कुणाकडे मदत मागितली?

आदिलशहा, **कुतुबशहा,** निजामशाह

कुतुबशहाची राजधानी कोणत्या शहरात होती?

**गोवळकोंडा**, विजापूर, आग्रा

शिवाजी महाराजांच्या सावत्र भावाचे नाव काय?

जीवाजी, तानाजी, **व्यंकोजी**

शिवाजी महाराजांचा सावत्र भाऊ व्यंकोजी दक्षिणेतील कोणती जहागीर सांभाळत होता?

**तंजावर**, म्हैसूर, मद्रास

शिवाजी महाराजांनी दक्षिणेत जाऊन कोणता किल्ला जिंकला?

पन्हाळगड, **जिंजी**, राजगड

शिवाजी महाराजांनी जिंजी किल्ला जिंकल्यावर कोणता किल्ला जिंकला?

**वेलूर**, लोहगड, विजयदुर्ग

संभाजी राजे मुघलांच्या कोणत्या सरदाराला जाऊन मिळाले?

**दिलेरखान**, अफजल खान, शाहिस्तेखान

शिवाजी महाराजांचा मृत्यू कोणत्या किल्ल्यावर झाला?

राजगड, **रायगड**, लोहगड

जंजिऱ्याच्या कोणा विरुद्ध शिवाजी महाराजांना आरमाराचे युद्ध करावे लागले?

मुघल, **सिद्धी,** रजपूत

--

## धडा १७, शिवरायांची युद्धनीती

शिवाजी महाराजांनी स्वराज्याची प्रतिज्ञा घेतली तेव्हा त्यांचे वय किती होते?

**१८**, २५, ३०

शिवाजी महाराजांच्या लढाई तंत्राचे नाव काय?

घोडेस्वारी युद्ध, पायदळ युद्ध, **गनिमी कावा**

शिवाजी महाराजांची पहिली राजधानी कोणती?

**राजगड**, रायगड, शिवनेरी

शत्रूच्या मूलखातील वसुलीच्या कोणत्या हिस्स्याला चौथाई म्हणत?

१/२, १/३, **१/४**

सिद्धी, पोर्तुगीज, आणि इंग्रजांपासून असलेल्या धोक्यापासून स्वराज्याला वाचवायला शिवाजी महाराजांनी काय उभारले?

**आरमार**, घोडदळ, पायदळ

--

## धडा १८, रयतेचा राजा

प्रति शिवाजी कोणाला म्हणत?

बाजीप्रभू देशपांडे, **नेताजी पालकर,** मुरारबाजी

नेताजी पालकरांचे मुसलमान झाल्यावर काय नाव झाले?

**मोहम्मद कुली खान,** अल्लाउद्दीन खिलजी, महंमद गोरी

नेताजी पालकरांना औरंगजेबाने कोठे पाठवले?

आग्रा, जिंजी, **काबूल**

शिवाजी महाराजांनी मुसलमान धर्मातून परत हिंदू धर्मात कोणाला घेतले?

**नेताजी पालकर आणि बजाजी निंबाळकर**, दिलेरखान आणि अफजल खान, तानाजी मालुसरे आणि येसाजी कंक

--

## धडा १९, स्फूर्तीचा जिवंत झरा

शिवाजी महाराजांची कुलदेवता कोण?

अंबाबाई, दुर्गादेवी, **भवानी देवी**

शिवाजी महाराजांनी राज्यकारभारात कोणती भाषा वापरता यावी यासाठी राज्य व्यवहार कोश बनवला?

**मराठी**, हिंदी, संस्कृत

--

**महाराष्ट्र धर्म वाढवावा, मराठी तितुका मेळवावा - शिवाजी महाराज की जय!**

**बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या "मराठी शाळा"** उपक्रमाविषयी अधिक माहिती मिळवण्यासाठी या संकेतस्थळाला भेट द्या:

https://bmmonline.org/marathishala/







--

# "शिवछत्रपती  अभ्यास  वर्ग" परीक्षा - प्रमाणपत्राचा नमुना



बृहन्महाराष्ट्र मंडळ (नॉर्थ अमेरिका)
शिवछत्रपती अभ्यास वर्ग

Certificate | प्रमाणपत्र

Bruhan Maharashtra Mandal (North America) certify that

बृहन्महाराष्ट्र मंडळ (नॉर्थ अमेरिका) असे प्रमाणित करण्यात येते की,

**Aarav Amit Joshi** | **आरव अमित जोशी**

has achieved Grade ' **A** ' in the ShivaChhatrapati Certification Examination conducted in February 2026

यांनी फेब्रुवारी २०२६ मध्ये आयोजित शिवछत्रपती प्रमाणपत्र परीक्षेत ' **अ** ' श्रेणीत यश संपादन केले आहे.

*In testimony whereof is set the seal of The Bruhan Maharashtra Mandal - North America*

याची साक्ष म्हणून बृहन्महाराष्ट्र मंडळ (नॉर्थ अमेरिका)ची अधिकृत मुद्रा येथे अंकित करण्यात येते.

**Mr. Rahul Deshmukh**
Director , Marathi Shala
Bruhan Maharashtra Mandal North America

**Date : 19 Feb 2026**

**Mr. Prasad Panwalker**
President,
Bruhan Maharashtra Mandal North America